**जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर**

**श्रीगोंदा-पारनेर उपविभागसाठी पिण्याचे पाणी वाहतूकीची फेर ई-निविदा सुचना**

अहमदनगर जिल्ह्यामध्ये दि.01/01/2017 ते 31/12/2017 या कालावधीत टंचाईग्रस्त गावात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी विहित अर्हता धारण करणा-या टँकर पुरवठा संस्थांकडून उपविभागनिहाय मागविण्यात आलेल्या ई-निविदेस अल्प प्रतिसाद मिळाल्याने मुळ ई-निविदेस प्रथम मुदतवाढ देण्यात आलेली होती. प्रथम मुदतवाढ कालावधीत श्रीगोंदा-पारनेर या उपविभागाकरीता चार ई-निविदा प्राप्त झाल्याने सदर उपविभागांच्या ई-निविदांचे तांत्रिक लिफाफयांची पडताळणी करण्यात आली. तांत्रिक पडताळणी मध्ये श्रीगोंदा-पारनेर उपविभागासाठी प्राप्त चार ई-निविदापैकी दोन संस्थांच्या ई-निविदा अपात्र ठरलेल्या आहे. त्यामुळे तीन पेक्षा कमी ई-निविदा पात्र झाल्याने श्रीगोंदा-पारनेर या उपविभागासाठी मुळ ई-निविदेतील अटी व शर्तीत बदल न करता खालील प्रमाणे फेर-ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.नं. | तपशिल | पिण्याचे पाणी वाहतूक निविदा |
|---|---|---|
| 1 | निविदा संकेत स्थळावरुन डाऊनलोड करुन अपलोड करण्याचा कालावधी व वेळ | दि.30/11/2016 पासून दि. 06/12/2016 रोजी दुपारी 02.00 वाजेपर्यंत |
| 2 | निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण | दि. 07/12/2016 रोजी दुपारी 02.00 वाजता नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय, अ.नगर |

क्र.टंचाई/कार्या 19अ/3637/2016

अहमदनगर दि. 30/11/2016

**जिल्हाधिकारी अहमदनगर**

# जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
## पिण्याचे पाणी वाहतूक ई-निविदा सुचना

---

अहमदनगर जिल्ह्याध्ये दिनांक 01/01/2017 ते 31/12/2017 या कालावधीत टंचाईग्रस्त गावांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी विहित अर्हता धारण करणा-या टँकर पुरवठादार संस्थांकडून श्रीगोंदा-पारनेर उपविभागासाठी फेर ई-निविदा (ऑनलाईन) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. निवड होणा-या संस्थेस डोंगराळ-दुर्गम भागासाठी 3000 ते 5000 लिटर क्षमतेचे व अन्य भागासाठी सर्वसाधारण 7500 ते 12000 लिटर किंवा आवश्यकतेनुसार त्यापेक्षा अधिक क्षमतेचे टँकर पुरवावे लागतील. निविदा संबंधीची सर्व माहिती व अटी-शर्ती www.ahmednagar.nic.in व https://mahatenders.gov.in/nicgep/app या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा भरणा-या टँकर पुरवठादार संस्थेने ऑनलाईन (Digital Signature Certificate) प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

| ई-निविदा भरणेचा कालावधी | ई-निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|
| दिनांक 30/11/2016 पासून 06/12/2016 रोजी दुपारी 2-00 वाजेपर्यत. | दिनांक 07/12/2016 रोजी दुपारी 02-00 वाजता स्थळ - नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर |

1. **निविदेची विक्री किंमत** - www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर फॉर्म फि रक्कम रु. 11,000/- (अक्षरी- रु अकरा हजार मात्र) ना-परतावा रक्कम ऑनलाईन इंटरनेट पेमेंट गेटवे ऑप्शनद्वारे ऑनलाईन भरणा केल्यानंतर डाऊनलोड करता येतील. त्याबाबतचा तपशिल निविदेसोबत स्कॅन करून अपलोड करावा लागेल.

2. **बयाना रक्कम** - उपविभाग निहाय ई-निविदा बयाणा रक्कम प्रत्येक उपविभागासाठी रु.1,10,000/- (अक्षरी रु.एक लक्ष दहा हजार मात्र) www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर रक्कम ऑनलाईन इंटरनेट पेमेंट गेटवे ऑप्शनद्वारे ऑनलाईन भरणा करावा

3. **सुरक्षा ठेव-**

   **अ)** रक्कम रु.20,00,000/-(रु.वीस लक्ष मात्र) ची सुरक्षा ठेव आवश्यक राहील.

   **ब)** सुरक्षा ठेव जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे नावाने अहमदनगर येथे वटणा-या राष्ट्रीयकृत बँकेची बँक हमी स्वरुपात देणे आवश्यक आहे. सदर बँक हमीचा कालावधी दिनांक 31/03/2018 पर्यतचा असणे आवश्यक आहे.

4. ई- निविदा दिनांक 07/12/2016 रोजी दुपारी 02-00 वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे उघडण्यात येतील.

5. कामाचा कालावधी हा दिनांक 01 जानेवारी 2017 (अथवा निविदा मंजूरीचे दिनांकापासून) ते 31 डिसेंबर 2017 पर्यत राहिल.

6. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे अधिकार मा.जिल्हाधिकारी यांनी राखीव ठेवले आहेत.

7. प्रस्तूत ई-निविदा ही www.ahmednagar.nic.in व https://mahatenders.gov.in/nicgep /app वर पाहावयास मिळेल. सदर निविदा डाऊनलोड करुन प्रिंट घेऊन ई-निविदा भरुन निविदेच्या प्रत्येक पानावर (फॉर्मसह) सही/शिक्का केलेली निविदा, निविदेची किंमत रु.11000/- व बयाना रक्कम रु.1,10,000/- चा ऑनलाईन इंटरनेट पेमेंट गेटवे ऑप्शनद्वारे ऑनलाईन भरणा केलेबाबत तपशिलाची प्रत, (प्रति उपविभाग), बॅंक गॅरंटी इत्यादी सर्व स्कॅन करुन अपलोड करावी

8. निविदेसंबंधी उपरोक्त तारखांमध्ये फेरबदल झाल्यास त्याची सुचना मुद्दा क्रमांक 9 मध्ये नमूद केलेल्या संकेत स्थळावर तसेच जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल. व्यक्तिगत सुचना देणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

**जिल्हाधिकारी अहमदनगर**

# जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
# पिण्याचे पाणी वाहतूक ई-निविदा सुचना

---

क्र.टंचाई/कार्या-19अ/3405/2016 -प्रस्तावना- अहमदनगर दिनांक 03/11/2016

अहमदनगर जिल्ह्याध्ये दिनांक 01/01/2017 ते 31/12/2017 या कालावधीत टंचाईग्रस्त गावांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी विहित अर्हता धारण करणा-या टँकर पुरवठादार संस्थांकडून श्रीगोंदा-पारनेर उपविभागासाठी फेर ई-निविदा (ऑनलाईन) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. निवड होणा-या संस्थेस डोंगराळ-दुर्गम भागासाठी 3000 ते 5000 लिटर क्षमतेचे व अन्य भागासाठी सर्वसाधारण 7500 ते 12000 लिटर किंवा आवश्यकतेनुसार त्यापेक्षा अधिक क्षमतेचे टँकर पुरवावे लागतील.

**ई-निविदा मिळण्याचे ठिकाण** - ई-निविदा **www.ahmednagar.nic.in** व **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. सदर निविदा संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेता येईल.

**ई-निविदेची फॉर्म प्राप्त करणेची पध्दत व फी** -

उपविभागनिहाय ई-निविदेचे फॉर्म दि.30/11/2016 ते दि.06/12/2016 या कालावधीत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर फॉर्म फि ऑनलाईन ना-परतावा रक्कम रु. 11,000/- (अक्षरी- रु अकरा हजार मात्र) ऑनलाईन इंटरनेट पेमेंट गेटवे ऑप्शनद्वारे ऑनलाईन भरणा केल्यानंतर डाऊनलोड करता येतील. त्याबाबतचा तपशिल निविदेसोबत स्कॅन करून अपलोड करावा लागेल.

**ई-निविदेसोबत अनामत रक्कम (बयाणा रक्कम व सुरक्षा अनामत)** -

1. **बयाना रक्कम** - रु.1,10,000/- (अक्षरी रु.एक लक्ष दहा हजार मात्र) www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर रक्कम ऑनलाईन इंटरनेट पेमेंट गेटवे ऑप्शनद्वारे ऑनलाईन भरणा करावा.

**सुरक्षा ठेव** -

**अ**. रु.20,00,000/- (रु.वीस लक्ष मात्र) ची सुरक्षा ठेव आवश्यक राहिल.

**ब**. सुरक्षा ठेव जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे नावाने अहमदनगर येथे वटणा-या राष्ट्रीयकृत बँकेच्या बँक हमी स्वरुपात देणे आवश्यक आहे. सदर बँक हमीचा कालावधी 31/03/2018 अखेर पर्यतचा असणे आवश्यक आहे.

निविदाकाराची स्वाक्षरी

**ई-निविदा हार्ड कॉपी स्विकारण्याची अंतिम दिनांक व वेळ (निविदेमधील दराचा फॉर्म वगळून)**

1) ऑनलाईन आपलोड केलेला ई-निविदा तांत्रिक लिफाफा क्र.1 दिनांक 06/12/2016 रोजी दु.04.00 वाजेपर्यंत नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे स्विकारली जाईल. सदरच्या निविदा दिनांक 07/12/2016 रोजी दुपारी 02.00 वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे उघडण्यात येतील.

2) ई-निवीदेचा तांत्रिक लिफाफा प्रत्यक्ष नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आणून दयाव्या लागतील. पोष्टाने प्राप्त होणा-या निवीदा स्विकारल्या जाणार नाहीत.

**ई-निविदा सादर करण्याची पध्दती -**

1. ई-निविदा ही दोन लिफाफे पध्दतीने (व्दी लिफाफा) सादर करावी लागेल.

2. दोन लिफाफ्यापैकी लिफाफा क्र.1 हा **तांत्रिक लिफाफा** असेल व लिफाफा क्र.2 हा **व्यापारी लिफाफा** (वाहतूक दराचा) असेल. ई-निविदा www.ahmednagar.nic.in **व** https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर पाहावयास मिळेल. सदर निविदा डाऊनलोड करुन प्रिंट घेऊन ई-निविदा भरुन निविदेच्या प्रत्येक पानावर (फॉर्मसह) सही/शिक्का केलेली निविदा, निविदेची किंमत रु.11000/- व बयाना रकम रु.1,10,000/- चा ऑनलाईन इंटरनेट पेमेंट गेटवे ऑप्शनद्वारे ऑनलाईन भरणा केलेबाबत तपशिलाची प्रत, रक्कम रु. 20.00 लक्ष ची बॅक गॅरंटी, निविदाधारकाने ई-निविदेच्या प्रत्येक पानावर स्वाक्षरी करुन निविदा इत्यादी सर्व स्कॅन करुन अपलोड करावी व त्याची मुळ प्रतीचा तांत्रिक लिफाफा क्र.1 या कार्यालयास दिनांक 18/11/2016 रोजी दु. 04.00 वाजणेपूर्वी सादर करावा. तांत्रिक लिफाफा क्र.1 मागविण्यांत आलेली सर्व कागदपत्रे, निविदेतील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणारा लिफाफा राहिल. लिफाफा क्र.2 टँकरद्वारे पाणी पुरवठा वाहतूक दराचा राहिल.

3. व्यापारी लिफाफा (लिफाफा क्र.२) हा प्रत्येक उपविभागासाठी वेगवेगळा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भरणे आवश्यक आहे. ई-निविदेचा **व्यापारी लिफाफा कार्यालयात समक्ष स्विकारला जाणार नाही**. तांत्रिक लिफाफा त्यातील कागदपत्रांसह सीलबंद करुन त्यावर स्पष्टपणे तांत्रिक लिफाफा ----------- -- या उपविभागासाठी लिफाफा असे नमूद करणे आवश्यक आहे. सदर लिफाफ्यावर जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर करिता पाणी पुरवठा निविदा जानेवारी 2017 ते डिसेंबर 2017 अखेर असे नमूद करण्यात यावे. तसेच सदर लिफाफ्यावर ई-निविदा सादर करणा-याचे नांव, पत्ता लिहिण्यात यावा. तांत्रिक लिफाफ्यामध्ये प्रत्येक उपविभागासाठी रु.1,10,000/- ऑनलाईन इंटरनेट पेमेंट गेटवे ऑप्शनद्वारे ऑनलाईन भरणा केलेबाबत तपशिलाची प्रत तसेच उपविभागनिहाय रु. 20,00,000/- (रु. वीस लक्ष मात्र) ची सुरक्षा ठेव राष्ट्रीयकृत बँकेच्या बँक हमी स्वरूपात समाविष्ठ असतील.

निविदाकाराची स्वाक्षरी

**तांत्रिक व व्यापारी लिफाफ्यात खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.**

(अ) तांत्रिक लिफाफा -

1. तांत्रिक लिफाफ्यातील खालील कागदपत्रे स्कॅन करून https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करावीत.

   **निविदा किंमत** - उपविभागनिहाय ई-निविदेचे फॉर्म दि. 30/11/2016 ते दि.06/12/2016 या कालावधीत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर फॉर्म फि ऑनलाईन ना-परतावा रक्कम रु. 11,000/- (अक्षरी- रु अकरा हजार मात्र) ऑनलाईन इंटरनेट पेमेंट गेटवे ऑप्शनद्वारे ऑनलाईन भरणा केल्यानंतर त्याबाबतचा तपशिल निविदेसोबत स्कॅन करून अपलोड करावा लागेल.

2. **बयाणा रक्कम** - बयाणा रक्कम उपविभागासाठी रु.1,10,000/- (अक्षरी रु.एक लक्ष दहा हजार मात्र) www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर रक्कम ऑनलाईन इंटरनेट पेमेंट गेटवे ऑप्शनद्वारे ऑनलाईन भरणा करावा.

3. **सुरक्षा ठेव** -

   अ. उपविभागासाठी रु.20,00,000/- (रुपये वीस लक्ष मात्र) ची सुरक्षा ठेव आवश्यक राहिल.

   ब. सुरक्षा ठेव अहमदनगर येथे वटणा-या राष्ट्रीयकृत बँकेच्या बँक हमी स्वरुपात देणे आवश्यक आहे. सदर बँक हमीचा कालावधी 31/03/2018 अखेर पर्यंतचा असणे आवश्यक आहे.

4. दिनांक 31/03/2016 अखेर आयकर थकबाकी नसलेबाबतचा प्रमाणपत्र.

5. पॅन कार्डची साक्षांकीत प्रत.

6. स्वतःचे मालकीच्या टँकर संबंधी रोड टॅक्स, इन्शुरन्स, फिटनेस, परमिट, नोंदणी प्रमाणपत्र, पी.यु.सी. व व्यवसाय कर इत्यादी बाबत पूर्तता करीत असल्यासंबंधी टँकरचे नंबर नमुद करुन उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे प्रमाणपत्र. (प्रपत्र 1)

7. संस्था इतरांची वाहने कराराने घेणार असेल तर अश्या टँकरची माहिती (प्रपत्र 2) व सोबत टँकर मालकाशी संस्थेने केलेला रु.100/- स्टॅम्प पेपरवर केलेल्या नोटरराईज कराराच्या प्रती (प्रपत्र 3 )

8. निविदाधारक संस्था प्रोप्रायटरशिप, पार्टनरशिप, प्रायव्हेट लिमिटेड, पब्लिक लिमिटेड, सहकारी संस्था इत्यादी ज्या प्रकारची असेल त्याप्रमाणे सक्षम प्राधिका-याकडे तीची नोंदणी केल्याचे नोंदणी प्रमाणपत्र.

9. संस्थेची नियमावली (बायलॉज) ची साक्षांकिंत प्रत.

10. संस्थेच्या उलाढालीचा व रोख भांडवलाचा तपशिला संबंधी पुरावे

    अ. सनदी लेखापाल अथवा वैधानिक लेखापरिक्षण अधिकारी यांनी प्रमाणीत केलेला मागील तीन वर्षाचा ताळेबंद (बॅलन्सशिट)

    ब. मागील तीन वर्षांच्या आयकर परताव्याच्या साक्षांकिंत प्रती.

    क. मागील एक वर्षाचे बँक पासबुकची साक्षांकिंत प्रत.

    ड. संस्थेच्या गुंतवणूक क्षमतेबाबत प्रमाणपत्र (प्रपत्र-4 )

निविदाकाराची स्वाक्षरी

11. निविदाधारक संस्था टँकर पुरवठयाचे काम करण्यास तयार असलेबाबत तसेच त्याअनुषंगाने होणा-या दायित्वास जबाबदार राहील अश्या आशयाचा संस्थेच्या सर्व संचालकांच्या स्वाक्षरीचा ठराव.(प्रपत्र-5)
12. मागील तीन वर्षाचे सनदी लेखापाल (C.A.) अथवा वैधानिक लेखापरिक्षण अधिकारी यांचे स्वाक्षरीचा लेखा परिक्षण तपासणी अहवाल.
13. यापूर्वी टँकरद्वारे पाणी पुरवठा केला असल्यास तसा अनुभवाचा दाखला. (प्रपत्र - 6)
14. निविदेतील अटी मान्य असलेबाबत रु 100/- स्टॅम्पपेपरवरील नोटरी/कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र. (प्रपत्र-7)
15. निविदाधारक संस्थेने निविदेच्या कामकाजा संबधी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस दिलेले Bidder’s Power of Attorney (प्रपत्र-8)
16. निविदाधारक संस्थेची परिपूर्ण भरलेली माहिती.(प्रपत्र-9)
17. निविदेतील अटी शर्ती माहिती व मान्य असल्याबाबत प्रत्येक पानावर निविदाधारकाने स्वाक्षरी केलेला मुळ निविदादस्त (टेंडर डाक्युमेंट)
18. निविदाधारक संस्थाने रोख भांडवलाबाबतचा तपशिल (बँक बॅलन्स/एफडी) जोडावा.
19. संस्था आर्थिक दृष्टया सक्षम असलेबाबत अन्य पुरावे.
20. संस्थे विरुध्द अगर तिच्या मालकांविरुध्द अथवा संचालकांविरुध्द आर्थिक अफरातफरीचे अगर फसवणूकी संबंधी गुन्हे दाखल नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र. (प्रपत्र - 10 )
21. संस्था मागणी प्रमाणे टँकर पुरविणेत समर्थ असलेबाबत संस्थेचे हमी पत्र

वरील सर्व कागदपत्रे ई-निविदेच्या संकेतस्थळावर स्कॅन करुन अपलोड करावेत तसेच सदर सर्व कागदपत्राची हार्ड कॉपी पहिल्या लिफाफ्यामध्ये ठेवून त्यावर “.-------------- या उपविभाग (जिल्हा अहमदनगर) करीता पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी टँकर पुरवठा करणे संबंधी ई-निविदेचा तांत्रिक लिफाफा” असे स्पष्ट नमूद करावे. तसेच त्यावर संस्थेचे नांव लिहावे अगर शिक्का मारावा.

(ब) व्यापारी लिफाफा (दराबाबतचा लिफाफा):-

व्यापारी लिफाफा (लिफाफा क्र.२) हा उपविभागासाठी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भरणे आवश्यक आहे. ई-निविदेचा व्यापारी लिफाफा कार्यालयात समक्ष स्विकारला जाणार नाही.

निविदाकाराची स्वाक्षरी

**ई- निविदेतील अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत** -

1) व्यक्तिगत निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. फक्त संस्थेच्या निविदा स्विकारल्या जातील. ( संस्था प्रोप्रायटरशिप, पार्टनरशिप, प्रायव्हेट लिमिटेड, पब्लिक लिमिटेड, सहकारी संस्था इत्यादी)

2) **अ)** एका उपविभागासाठी रु.20,00,000/- (रुपये वीस लक्ष मात्र) ची सुरक्षा ठेव आवश्यक राहील. **ब)** सुरक्षा ठेव अहमदनगर येथे वटणा-या राष्ट्रीयकृत बँकेच्या बॅंक हमी स्वरुपात देणे आवश्यक आहे. सदर बँक हमीचा कालावधी 31/03/2018 अखेर पर्यतचा असणे आवश्यक आहे.

3) वाहन टाकीसह सुस्थितीत असणे आवश्यक आहे.

4) ई-निविदेतील तांत्रिक लिफाफा एकच असला तरी उपविभाग निहाय व्यापारी लिफाफ्यामध्ये दर भरणे आवश्यक आहे.

5) व्यापारी लिफाफ्यात प्रति मे.टन दैनिक भाडे व प्रति मे.टन प्रति किलोमिटर वाहतूक भाडे भरण्यात यावे.

6) डोंगराळ व दुर्गम भागासाठी 3000 ते 5000 लिटर क्षमतेच्या टॅंकरसाठी व अन्य भागाकरीता 7500 लिटर्स व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या टॅंकर्ससाठी प्रति मे. टन वेगवेगळे दर भरण्यात यावेत.

7) निविदाधारकास कमीत कमी एक वर्ष शासकीय पाणी पुरवठा करण्याचा अनुभव असणे जरुरी आहे. तसे संबंधित सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.

8) यशस्वी निविदा धारकास आवश्यकते प्रमाणे टॅंकर्स पुरवठा करणे बंधनकारक राहील. निविदा धारकाकडे स्वतःची अथवा संस्थेच्या सभासंदाच्या मालकीची किमान 10 टॅंकर्स असणे बंधनकारक आहे. अन्य टॅंकर्स इतर व्यक्ती/संस्था यांचेकडून घेता येतील तथापि त्याबाबत निविदाधारक व टॅंकर मालक यांच्यात कायदेशीररित्या संमतीपत्रक/करारनामा असणे बंधनकारक आहे. निविदा भरताना निविदा धारकाने किमान 150 टॅकर्सचा पुरवठा करु शकतील याचा तपशिल व टॅंकर्स मालकीची असल्यास त्या संबंधीची कागदपत्रे व टॅंकर्स इतरांकडून प्राप्त करुन घेणार असल्यास, त्याबाबतचे करारपत्र/संमतीपत्र निविदेसोबत पुरव्याखातर सादर करावे.

9) यशस्वी निविदाधारकास कोणत्याही उपकत्रांटदाराची/ठेकेदारांची नेमणूक करता येणार नाही.

10) **पाणी पुरवठयाकामी उपलब्ध करुन देण्यात येणा-या प्रत्येक टॅंकरवर जीपीएस प्रणाली निविदाधारकाने स्वखर्चाने बसविणे बंधनकारक राहिल. सदर यंत्रणा बसविणे व त्यांची देखभाल दुरुस्ती इ.चा खर्च निविदाधारक यांनी स्वंतः करावा लागेल.**

11) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक दि. 4 जानेवारी 2014 नुसार टॅंकरची देयके अदा करताना टॅंकरवर जी.पी.एस प्रणाली बसविलेली असणे व जी पी एस प्रणालीवर ज्या टॅंकरच्या फे-यांची नोंद होईल त्याच फे-या देयकांकरीता अनुज्ञेय राहिल. ज्या पाणी पुरवठा करणा-या टॅंकरवर जी पी एस प्रणाली किंवा जी पी एस प्रणाली असूनही त्या बंद असल्याकारणाने टॅंकर वाहतूक धारकाच्या फे-या झाल्याचा दावा केला असल्यास अशा फे-या बनावट ठरतील व त्यासाठी देयक अदा केले जाणार नाही. याची निविदाधारक यांनी नोंद घ्यावी.

निविदाकाराची स्वाक्षरी

12) जी पी एस प्रणालीच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांची राहील. त्यांनी जी पी एस प्रणालीवर नोंदविण्यात येणा-या दैनंदिन खेपांचा अहवाल दररोज सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना सादर करावी.

13) यशस्वी निविदाधारकांस पाणी पुरवठयाकामी उपलब्ध करून दयावयाच्या टँकरची नंबर निहाय यादी संबधित टँकर मालकांच्या संमतीपत्रक व त्याच्याशी झालेल्या करारनाम्याच्या प्रतिसह टंचाई शाखेस व संबंधीत गटविकास अधिकारी यांना दयावी लागेल. टँकरची कागदपत्रे पडताळणी करण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी यांची असेल.

14) यशस्वी निवीदाधारकास पुरवठा करण्यात येणाऱ्या प्रत्येक टँकरसाठी अनामत रक्कम रु.2000/- (दोन हजार मात्र) टँकर पुरवठा करण्याचे आदेश दिल्यापासून आठ दिवसाचे आत शासनास जमा करावे लागतील. अशा प्रकारे अनामत जमा न केल्यास ती देयकातून वजावट करुन घेण्याचे अधिकार संबंधित तालुक्याचे गट विकास अधिकारी यांना राहतील. तसेच प्रति टँकर रुपये 500/- पर्यंत दंड करण्याचे अधिकारही गट विकास अधिकारी यांना राहतील.

15) टँकर पुरवठा करण्याचे आदेश दिल्यानंतर यशस्वी निविदाधारकास टँकर संबंधीत तालुका मुख्यालयातील गटविकास अधिकारी यांचे कार्यालयात प्रथमतः उपस्थित करावा लागेल. तेथे किलो मीटर रिडींग घेणेत येईल, तसेच टँकर बंद करण्याचे आदेश झालेनंतर टँकर गटविकास अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित करुन त्याचे मीटर रिडींग दयावे लागेल. गटविकास अधिकारी कार्यालयापर्यंत टँकर आणण्यासाठी किंवा गटविकास अधिकारी कार्यालयातून टँकर त्याचे मूळ ठिकाणी नेण्यापर्यंतचे अंतराचे वाहतूक भाडे देण्यात येणार नाही.

16) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-टंचाई-2012-प्रक्र-53/पापु-14, दिनांक 30 एप्रिल, 2012 मधील अट क्रः 2 नुसार टँकरच्या पाण्याच्या टाकीची वहन क्षमता संबंधीत उप प्रादेशिक परिवहन अधिकारी किंवा तालुक्याचे उप अभियंता, ग्रा.पा.पु. विभाग यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

17) यशस्वी निविदाधारकास त्यानी पुरवठा केलेल्या टँकरला ठरवून देण्यात आलेल्या दैनिक खेपा करणे बंधनकारक राहील. अशा खेपा करण्यास कसूर झाल्यास वाहतूक भाडे अदा करण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे कमी झालेल्या खेपांच्या प्रमाणात दैनिक भाडयातही कपात करण्यात येईल.

18) प्रत्येक टँकरच्या प्रमाणित क्षमतेनुसार प्रतिदिन भाडे व प्रति किलोमीटर भाडे आवश्यक ती पडताळणी केल्यानंतर अदा करण्यांत येईल. यशस्वी निविदाधारकास दर महिन्याला म्हणजे दर महिन्याच्या 5 तारखेच्या आत मध्ये देयक सादर करावे लागेल.

19) टँकरवर काम करणा-या कर्मचाऱ्यांचे (अधिकृत वाहन चालक व मदतनिस) वेतन व भत्ते तसेच टँकरसाठी लागणारे तेल, इंधन व इतर खर्च वाहन मालकानेच अदा करावयाचे आहेत, यासाठी निविदाधारकाने स्वतंत्र व्यवस्था करावी.

20) यशस्वी निविदाधारकास किंवा त्यानी पुरवठा केलेल्या टँकरला कोणतीही आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. त्याचप्रमाणे शासनामार्फत इंधन पुरवठा केला जाणार नाही.

21) मंजूर झालेल्या निविदा धारकास रु.100/- किंमतीचे मुद्रांक स्टँम्पपेपरवर पंधरा दिवसात विहीत अटी व शर्ती मान्य असल्याबाबत करारनामा करुन द्यावा लागेल. सदरचा करारनामा उपनिबंधक यांचेकडे नोंदवावा लागेल व त्यासाठी येणारा खर्च संबंधीत ठेकेदार यांना करावा लागेल. मुदतीत करारनामा न करून दिल्यास दंडात्मक कारवाई किंवा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

निविदाकाराची स्वाक्षरी

22) यशस्वी निविदाधारकास तालुक्याच्या ठिकाणी स्वतंत्र पर्यवेक्षक तथा समन्वयक कर्मचारी नेमावा लागेल. त्याच्यावर प्रत्येक टँकरच्या रोज होणाऱ्या खेपांची माहिती घेणेची जबाबदारी तसेच बंद पडलेल्या टँकरला पर्यायी टँकर देण्याची जबाबदारी राहील. त्याचप्रमाणे टँकरचे कामकाज कार्यक्षमतेने होणेसाठी तो तहसिलदार व गटविकास अधिकारी यांचेशी आवश्यक तो समन्वय साधेल, तसेच त्या संबंधीच्या अडीअडचणीचे निराकरण करेल.

23) यशस्वी निविदाधारकास ठरवून दिलेल्या मुदतीत कार्यक्षमतेने व करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्याची निविदा रद्द करणेत येईल व बयाणा रक्कम व सुरक्षा ठेव जप्त करणेत येईल. याशिवाय, दुस-या न्यूनतम यशस्वी (एल-2) निविदाधारकाकडून काम करुन घेण्यात आल्यास त्याकरीता होणारा जादा खर्च मूळ यशस्वी निविदाधारकाकडून वसूल करणेत येईल.

24) अहमदनगर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची वाहतूक जिथे पाणी उपलब्ध असेल त्याठिकाणाहून करावी लागेल. कोणत्याही कारणास्तव पाणी पुरवठा बंद असल्यास त्या कालावधीचे भाडे देण्यात येणार नाही.

25) टँकरने पाणी पुरवठा करण्याचे काम अधिक सुलभतेने व कार्यक्षमतेने होण्यासाठी एखादा पाण्याचा स्त्रोत यशस्वी निविदाधारकाने सुचविल्यास व तो योग्य असल्याची खातरजमा गटविकास अधिकारी यांची झाल्यास तो अधिग्रहीत करुन देण्यात येईल.

26) शासन नियमाप्रमाणे बिलातून आयकर व त्यावरील सरचार्ज कापून घेणेत येईल. आयकर खात्याने आयकर अथवा व्याजाची किंवा दोन्हीही मागणी केल्यास त्याची भरपाई निविदाधारकास करावी लागेल.

27) पाणी वाहतुक कालावधी दरम्यान टँकरचा देखभाल व दुरुस्ती खर्च हा टँकर मालकांस करावा लागेल. टँकर नादुरुस्त झाल्यास त्याची दुरुस्ती तात्काळ करण्यात येऊन पाणी वाहतूकीत कुठल्याही प्रकारचा खंड पडता कामा नये. नादुरुस्त टँकर जर ताबडतोब दुरुस्त होणार नसेल तर त्वरीत पर्यायी टँकरची व्यवस्था यशस्वी निविदाधारकास करावी लागेल. 24 तासांत पर्यायी टँकर उपलब्ध करुन न दिल्यास प्रतिदिन प्रतिटँकर रु.2000/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल. दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार संबंधीत गट विकास अधिकारी यांना राहतील.

28) **टँकरला कुठल्याही प्रकारचा अपघात झाल्यास वा वाहनाने कोणत्याही प्रकारचे नुकसान केल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी यशस्वी निविदाधारकांची/टँकर चालक व टँकर मालकाची राहील, याबाबत शासनाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. त्यासाठी शासनाकडून कोणताही मोबदला/ नुकसान भरपाई दिली जाणार नाही याबाबत शासना विरोधात नुकसान भरपाईचा दावा करता येणार नाही.**

29) **टँकरद्वारे पाणी पुरवठा निविदा कालावधीत यशस्वी निविदाधारकाने (ठेकेदाराने) इतर कोणत्याही व्यक्ती/संस्थेशी केलेला करार/ खाजगी व्यवहाराची संपुर्ण जबाबदारी निविदाधारकाची/ठेकेदाराची राहील.**

निविदाकाराची स्वाक्षरी

30) पाणी वाहतुकीसाठी पुरविलेल्या टँकरचे स्पिडोमिटर सुस्थीतीत ठेवणे ही जबाबदारी यशस्वी निविदाधारक यांची राहिल. स्पिडोमिटर बंद पडल्यास गट विकास अधिकारी लॉग बुकमध्ये जे कि.मी. दाखवतील ते यशस्वी निविदाधारक यांचेवर बंधनकारक राहील.

31) संबंधित गटविकास अधिकारी यांनी प्रत्येक टँकरला खेपा ठरवून देताना त्या वस्तूनिष्ठ असाव्यात असे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याबाबत यशस्वी निविदाधारकास काही आक्षेप असल्यास 8 (आठ) दिवसामध्ये त्यांनी गटविकास अधिकारी यांचेकडे याबाबत लेखी निवेदन द्यावे. त्यावर गटविकास अधिकारी घेतील तो निर्णय अंतिम राहील. एकदा खेपा ठरवून दिल्यानंतर तेवढ्या खेपा करणे यशस्वी निविदाधारकावर बंधनकारक राहील.

32) प्रत्यक्षात टँकर पुरविण्याचे आदेश दिल्यावर त्या आदेशाच्या दिनांकापासून 24 तासामध्ये टँकर आदेशात नमूद केलेल्या ठिकाणी उपलब्ध करुन द्यावे लागेल. आवश्यकतेनूसार टँकर लावण्याचे अथवा बंद करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी यांचे राहतील. केवळ निविदा मंजूर झाली म्हणून काम देणे जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही.

33) यशस्वी निविदाधारकाकडून करारनाम्याप्रमाणे पूर्ण क्षमतेने काम करुन घेण्याचे अधिकार संबंधीत गटविकास अधिकारी यांना राहतील. त्यासाठी टँकरची क्षमता, मार्ग व खेपा ठरविणे याबाबतचे अधिकार गटविकास अधिकारी यांना राहतील. गटविकास अधिकारी यांनी याबाबत दिलेले आदेश यशस्वी निविदाधारकावर बंधनकारक राहतील.

34) टँकरला देण्यात येणारे प्रतिदिन व प्रतिकिमी भाडे हे 1 मे.टन एककाच्या प्रमाणात देण्यात येईल.

35) पिण्याचे पाणी वाहतुकीचा कालावधी या कार्यालयाचे आदेश दिलेपासून दिनांक 31/12/2017 अखेर किंवा टंचाई कालावधी संपेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील.

36) निविदेमध्ये नमुद केलेले दर सर्व समावेशक असावेत. त्याबाबत इतर कोणतीही वेगळी भरपाई दिली जाणार नाही. मंजूर झालेल्या निविदेतील दरामध्ये वाढ केली जाणार नाही.

37) निविदाधारक/सहकारी संस्था यांना काळ्या यादीत घोषित केलेले असल्यास अशा निविदाधारक /सहकारी संस्था यांनी निविदा भरु नयेत. असे आढळून आल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही.

38) निविदा मंजूर झाल्यानंतर निविदा धारकास टँकरवर " **महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा** : पाणी **भरण्याचे ठिकाण व पाणी पुरवठयाची ठिकाणे** " अशा माहितीचा बोर्ड ठळक अक्षरात टँकरच्या दर्शनी भागावर लावावा लागेल. असे न आढळल्यास रुपये 500/- इतका दंड करण्यात येईल.

39) जिल्हयात पाणी पुरवठा करतांना टँकरला भरावा लागणारा पथकर (Toll Tax) संबंधीत वाहतूक ठेकेदारास भरावा लागेल.

40) टँकरचे लॉगबुक एक प्रतीत ठेवावे लागेल. लॉगबुक सर्व नोंदीची अद्यावत ठेवणेची जबाबदारी संबंधीत टँकर चालकाची राहिल. टँकरचे लॉगबुक गहाळ झाल्यास त्या कालावधीचे बील अदा केले जाणार नाही.

निविदाकाराची स्वाक्षरी

41) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रं.टंचाई /1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24 जानेवारी, 2006 नुसार मंजूर खेपा होत असलेबाबत प्रत्येक खेपेच्या वेळी त्या त्या गावातील पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेल्या दोन महिला सदस्यांची स्वाक्षरी तारीख व वेळेसह लॉगबुक वर घेणे टँकर चालकावर बंधनकारक राहील.

42) उद्भवाच्या ठिकाणी उद्भव नोंदवही ठेवण्यात येईल. त्यावर प्रत्येक खेपेच्या वेळी दिनांक व वेळेसह टँकर भरल्याची नोंद घेवून टँकरच्या लॉगबुक वर सर्व रकाने भरण्याची जबाबदारी टँकर चालकाची राहील.

43) निविदाधारकाने सादर केलेले दर हे निविदा उघडण्याच्या दिनांकापासून 90 दिवसापर्यंत स्विकृतीस पात्र (विधीग्राहय) रहातील.

44) यशस्वी निविदाधारकाने तालुक्यात नेमलेल्या पर्यवेक्षक तथा समन्वयक कर्मचाऱ्याने प्रत्येक टँकरने दररोज केलेल्या खेपांची माहिती त्याच दिवशी गटविकास अधिकारी व तहसिलदार यांना अगर त्यांनी प्राधिकृत केलेल्या कर्मचाऱ्यांस देणे बंधनकारक राहील.

45) सादर करावयाचे दर हे प्रत्येक उपविभागासाठी वेगवेगळे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भरणे आवश्यक आहे.

46) निविदा फॉर्मच्या प्रत्येक पानावर निविदा धारकाने किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीने स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

47) निविदाधारक संस्थेच्यावतीने निविदेवर स्वाक्षरी करण्यास, निविदेसंबधीच्या बैठकांना उपस्थित रहाण्यास किंवा तांत्रिक व इतर माहिती पुरवण्यास एखादया व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास, त्या संबधीचे निविदाधारकांचे प्राधिकारपत्र (Bidders Power of Attorney) देणे आवश्यक आहे.

48) निविदाधारकाने निविदा सादर करतांना निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी/शर्ती, नियम याव्यतिरिक्त स्वतःची कोणतीही अट निविदेमध्ये समाविष्ठ करु नये. अशा पध्दतीच्या सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

49) या ई-निविदे संदर्भात निविदा प्रक्रिये दरम्यान किंवा निविदा स्विकृतीनंतर कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास जिल्हाधिकारी अहमदनगर यांचा निर्णय अंतिम राहिल.

50) करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास जिल्हाधिकारी अहमदनगर ठरवतील ती रक्कम किंवा संपूर्ण सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल.

51) निविदाधारकाने निविदा प्रक्रियेवर परिणाम करेल अशा भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्यास किंवा निविदा प्रक्रियेशी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्याही प्रकारचे प्रलोभन दाखविणे, दबाव आणणे अशा मार्गाचा अवलंब केल्याचे जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास आल्यास सदर निविदाधारकाची निविदा अपात्र करण्यात येईल.

52) बयाणा रक्कम किंवा सुरक्षा अनामत यासाठी कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

निविदाकाराची स्वाक्षरी

53) निविदापूर्व बैठकीस (Pre-Bid Meeting) हजर राहण्याची जबाबदारी इच्छुक निविदाधारकाची राहील. सदर बैठकी मध्ये प्रस्तूत नमूद अटीमध्ये त्या बदलणे, वगळणे किंवा नविन अटींचा समावेश करणे इत्यादी निर्णय झाल्यास तो या निविदेतील अटींचा भाग म्हणून संबोधण्यात येईल व असा बदल निविदाधारकावर बंधनकारक राहील.

54) कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा निविदेतील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी राखून ठेवला आहे.

55) जिल्ह्यातील एखाद्या उपविभागातील निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्यास सदर उपविभागाचे शेजारच्या उपविभागात ज्या संस्थेची निविदा मंजूर झालेली आहे त्या निविदा धारक संस्थेस त्यांना मंजूर असलेल्या दरामध्ये टँकर पुरवठा करणे बंधनकारक राहिल.

निविदाकाराची स्वाक्षरी

प्रपत्र- 1

उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करणेत येते की, ---------------------------------------------------------------
पत्ता----------------------------------------------या संस्थेच्या मालकीचे/सहकारी संस्था, प्रोप्रायटरशिप, पार्टनरशिप, प्रायव्हेट लिमिटेड, पब्लिक लिमिटेड इत्यादी संस्थेच्या सभासदांच्या मालकीचे खालीलप्रमाणे ट्रक/टँकर आहेत.

| अ.क्र. | टँकर/ट्रक क्रमांक | टँकर/ट्रक मालकाचे नांव |
|---|---|---|
| 1 | | |
| 2 | | |
| 3 | | |
| 4 | | |
| 5 | | |
| 6 | | |
| 7 | | |
| 8 | | |
| 9 | | |
| 10 | | |

उपरोक्त सर्व ट्रक/टँकरचा रोड टॅक्स, इंशुरन्स, परमिट नोंदणी प्रमाणपत्र, पी.यु.सी.व व्यवसाय कर आज मितीस भरलेले आहेत/ परवाना घेतलेला आहे. उक्त सर्व टँकर / ट्रक सदर संस्थेस वाहतूक कंत्राट मिळाल्यास काम करण्यास सक्षम व पात्र आहेत.

ठिकाणः- अहमदनगर

दिनांक :- / /2016

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
अहमदनगर

प्रपत्र- 2

संस्थेने इतरांची वाहने कराराने घेणार असेल तर अशा टँकरची माहितीचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आमची संस्था ----------------------------------------

पत्ता------------------------------------------------यांना ----------------------------उपविभाग जि.अहमदनगर येथे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याचे कत्राट मिळाल्यास खालील नमुद केलेल्या क्रमांकाचे टँकर्स/ट्रक आम्ही त्याचेशी केलेल्या कराराचे आधारे उपलब्ध करून देऊ.

| अ.क्र. | टँकर क्रमांक | टँकरची क्षमता | मालकांचे नांव | संस्थेने टँकर मालकाशी केलेल्या करारनाम्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(संस्थेच्या अध्यक्षाची सही व शिक्क )

प्रपत्र-3

टँकर मालकाने संस्थेशी करावयाचा करारनामा (रु.100/- च्या स्टॅम्प पेपर वर)

प्रमाणित करण्यात येते की, -----------------------------------------या संस्थेस ------------- उपविभागासाठी अहमदनगर जिल्हयातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याचे कत्राट मिळाल्यास मी सदर संस्थेस माझे स्वतःच्या मालकीचे खालील नमुद केलेल्या क्रमांकाचे टँकर्स/ट्रक दि. 31/12/2017 पर्यत किंवा टंचाई कालावधी संपेपर्यत यापैकी जो कालावधी अगोदर घडेल तो पर्यत टंचाईग्रस्त भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेस टँकर उपलब्ध करून देणेस खालील नमुद केलेल्या अटी शर्तीस अधिन राहून करार करीत आहे.

| अ.क्र. | टॅकर्स/ट्रक क्रमांक | टँकरची वहन क्षमता |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

अटी/शर्ती

1. या कराराचा कालावधी दि. 01/01/2017 पासून ते 31/12/2017 पर्यत किंवा टंचाई कालावधी संपेपर्यत यापैकी जो कालावधी अगोदर घडेल तो पर्यत राहील.
2. माझे मालकीचे उपरोक्त क्रमांकाचे ट्रक/टॅकर टंचाई कालावधीमध्ये पिण्याचे पाणी वाहतूक करणे कामी लावावयाची आहे त्यासाठी मी परवाना धारक चालकाची नेमणूक केली असून त्याचेकडून काही अपघात घडलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी माझेवर राहिल, त्याची तोशीस संस्थेला लागू देणार नाही.
3. माझे ट्रक/टँकरवर वाहन चालक, क्लिनर मी स्वतः नेमून त्यांना वेतन व भत्ता खर्च स्वतः आदा करीत.
4. मा.जिल्हाधिकारी कार्यालय/तहसीलदार अथवा गट विकास अधिकारी यांचे आदेशानुसार मी जिल्हयात टंचाईग्रस्त भागामध्ये पिण्याचे पाणी वाहतूक विना तक्रार वाहतूक काम करील.
5. पाणी वाहतूक करताना माझे ट्रक/टॅकरचा विमा उतरविलेला असून टॅक्स, परमिट, पासींग सर्व पुर्ण मुदतीतील आहे. त्या बाबतची जबाबदारी माझेवर राहील. त्यामुळे होणारे नुकसानीची जबाबदारी माझेवर राहील.
6. पाणी वाहतूक कामाचे पेमेंट संस्थेकडून/शासनाकडून जे मिळेल ते मला मान्य आहे.
7. पाणी वाहतूक काम करीत असताना विना अपघात काम करणे माझेवर बंधनकारक राहील. त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी माझेवर राहील. अपघात घडल्यास त्यासाठी मी व माझा ट्रक/टॅकर चालक जबाबदार आहे. त्यासाठी संस्था अथवा शासनास जबाबदार राहणार नाही
8. पाणी वाहतूक काम करित असताना वाहनासाठी लागणारे डिझेल/ऑईलचा हिशोब वाहन चालक ठेवील त्याबाबतची सर्व जबाबदारी माझेवर राहील
9. पाणी वाहतूक काम करित असताना लॉगबुक ग्रामसेवकांच्या सहया घेऊन गटविकास अधिकाऱ्यांकडे देणे व माझे तिन (3) झेरॉक्स प्रति सादर करणे माझेवर बंधनकारक राहिल. त्याशिवाय वाहतुक पेमेंट मिळणार नाही. याची मला जाणीव आहे

10. पाणी वाहतुक काम करताना ट्रक/टॅकर नादुरुस्त झाल्यास त्वरीत दुरुस्त करुन पाणी वाहतुक खडीत होणार नाही याची दक्षता घेईल त्याची जबाबदारी माझेवर राहील.

11. मी माझे ट्रक/टॅकरमध्ये कोणतेही प्रवासी बसविणार नाही. त्याबाबत व अपघात झाल्यास त्याची जबाबदारी माझेवर राहील. त्याबाबत संस्था अथवा शासन जबाबदार राहणार नाही.

12. माझे ट्रक/टॅकरवर बसविलेल्या टाक्या गळक्या राहणार नाही याची दक्षता घेईल. तसेच टाक्या अपघाताने फुटल्यास त्याची जबाबदारी माझेवर राहील.

13. गटविकास अधिकारी यांचे आदेशानुसार पाणी पुरविण्याबाबत दिलेले काम/खेपा पुर्ण करणेची दक्षता घेईल.

14. ट्रक/टॅकर ज्यादिवशी प्रत्यक्ष वाहतुक कामावर चालु होईल त्यादिवसापासून भाडे मिळेल. तसेच डिझेल आणणेसाठी लागणारे किलोमीटरचे भाडे मिळणार नाही. यांची मला जाणीव आहे. डिझेल स्वतः मी भरावयाचे आहे हे मला मान्य आहे.

15. शासनाकडून पेमेंट झाल्यानंतरच मला मिळेल याची मला जाणीव आहे त्यामुळे मी आगाऊ रक्कमेची मागणी करणार नाही.

16. पाणी वाहतुक करित असतांना लागणारे इंधन (डिझेल) मी पुरवायचे आहे

17. ट्रक/टॅकर पुर्ण टंचाई संपेपर्यत चालु ठेवीन मध्येच ट्रक/टॅकर पाणी वाहतुकीचे कामावरुन माझेमुळे बंद झाल्यास शासनाच्या नियमाप्रमाणे नुकसान भरपाई म्हणुन जी जास्तीची रक्कम राहील ती माझे पेमेंट मधुन वसुल करण्यास माझी हरकत राहणार नाही.

वाहन(टॅकर/ट्रक) मालकाची सही

## |É{ÉjÉ -4

**Banker's / CA's Certificate for Investible Funds**

Ref :-------------------------------------------- Date : ----------------------

To,

In response to the Tender No. ---------------------------------dt.---------------- of the, Ahmednagar ----------------------------------- of The Private Water Supply By Truck / Tanker Tender, this is to certify that ------------------------------------------------------------------------(Name of Bidder) is having balance of Rs. ---------------------------in their account & are capable of investing funds to the extent of Rs. ------------------------------(Ruppes -------------------------------------------------------) for the said tender.

DATE :

PLACE: SIGNATURE :

Taluka / FDO.

------------------------------------

(BANK'S COMMON SEAL)

निविदाकाराची स्वाक्षरी

प्रपत्र - 5

टँकर पुरवठ्याचे काम करण्यास तयार असलेबाबत तसेच त्याअनुषंगाने होणा-या दायित्वास जबाबदारीबाबत संस्थेच्या संचालक मंडळाचा ठराव

-----------------------------------------------------------------------------------------------------------

दिनांक - / /2016

विषय नं. अहमदनगर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी सन 2017 ची टँकरचा पुरवठा निविदा भरण्याबाबत, निविदा मंजूर झालेनंतर काम सुरळीत पारपाडणे व त्याअनुषंगाने होणा-या दायित्वास जबाबदारीबाबतचा ठरावाबाबत.

ठराव नं. मा.जिल्हाधिकारीसो. अहमदनगर यांनी दिनांक / /2016 रोजी सन 2017 करीता जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाण्याचा पुरवठा करणेकरीता उपविभागानिहाय टँकर पुरवठा निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील ------------- उपविभागासाठी टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी संस्थेने निविदा भरून देऊन संस्थेच्या ट्रक/टँकर मालक सभासदांना काम उपलब्ध करुन द्यावे. संस्थेची निविदा मंजूर झालेनंतर सदरचे काम सुरळीत पार पाडणेकामी संचालक मंडळ तयार असून त्याअनुषंगाने होणा-या दायित्वास संस्थेचे संचालक मंडळ जबाबदार राहिल. असे सर्व उपस्थीत संचालकांच्या वतीने एकमताने ठरले. त्यास ही सभा संमती देत आहे

सुचकाचे नांव व स्वाक्षरी

अनुमोदकाचे नांव व स्वाक्षरी

संचालकांची नावे व स्वाक्षरी

प्रपत्र - 6

टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेबाबत अनुभवाचे प्रमाणपत्र

प्रमाणीत करण्यात येते की, --------------------------------------------------------पत्ता -------- --------------------------------या संस्थेने दिनांक / / ते / / या कालावधीत पिण्याचे पाणी पुरवठयाचे काम दिलेल्या आदेशाप्रमाणे समाधानकारक रित्या पूर्ण केलेले आहे.

ठिकाण -

दिनांक - सिक्का सही-

पद्नाम-

प्रपत्र- 7

निविदेतील अटी शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र

( 100/- रुपये स्टॅम्प पेपरवर द्यावयाचा मजकूर )

मी, ---------------------------------------------------------------------------------------------------- ------------------------- याद्वारे शपथेवर निवेदन करतो की, मी मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामिण भागातील गावे / वाड्या / तांडे यांना पिण्याचे पाण्याचे टंचाई अंतर्गत दि. /09/2016 रोजी काढलेल्या पिण्याचे पाण्याचे वाहतूकीचे निविदेतील अटी व शर्ती पूर्णपणे वाचून समजावून घेतलेल्या आहेत. पिण्याचे पाणी वहातूक निविदेतील अटी आणि शर्ती मला मंजूर असून त्या अटी व शर्तीचे मी पूर्णपणे पालन करील.

मी असेही शपथेवर निवेदन करतो की, पिण्याच्या पाण्याची टंचाई ही अतिसंवेदनशील बाब असल्याचे मला मान्य आहे. मी अहमदनगर जिल्ह्यातील गांवे, वाड्या, तांडे यांना माझी पिण्याचे पाण्याची वाहतूक निविदा मंजूर झाल्यास आवश्यकतेनुसार माझे स्वतःचे अथवा टॅंकर्स / ट्रक मालकासोबत केलेल्या करारनाम्याच्या आधारे इंधनासह वाहने पुरविल. तसेच करार केलेल्या टॅंकर/ट्रक संबंधी रोड टॅक्स, इन्शुरन्स, फिटनेस, परमिट, नोंदणी प्रमाणपत्र, पी.यु.सी., व्यवसाय कर व जी.पी.एस. प्रणाली बसविणे इत्यादी बाबत पूर्तता करील.

वरील मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व सत्य आहे. मी आवश्यकतेप्रमाणे वाहने न पुरविल्यास निविदेत नमूद केलेल्या अटी आणि शर्तीनुसार दंडणीय कार्यवाहीस पात्र राहील. तसेच टॅंकर/वाहने न पुरविल्यास मी भा.द.वि.कलम 199 व 200 प्रमाणे शिक्षेस पात्र राहील. सदर मजकूर मी आज दि. / /2016 रोजी मुक्कामी प्रमाणित केलेला आहे.

निविदा धारक यांची स्वाक्षरी

संपूर्ण नांव व पत्ता.

( सदरचा मजकूर विशेष कार्यकारी दंडाधिकारी, यांचेसमोर नोंदविलेला असावा.)

प्रपत्र- 8

**BIDDER'S POWER OF ATTORNEY**

To,

<Bidder's Name>-----------------------------------------------------------------------, <Designation>-----------------------------is hereby authorized to sign relevant documents on behalf of the company in dealing with Tender of reference <Tender No. & Date>------------------------------. He is also authorized to attend meetings & submit technical & commercial information as may be required by your in the course of processing above said tender.

Thanking You,

Authorized Signatory.

--------------------------------------------------------------

Tenderers
Seal

प्रपत्र- 9

**Bidder's Information**

**IN RESPONSE TO THE PRIVATE WATER SUPPLY BY TRUCK / TANKER TENDER NOTICE PUBLISHED BY THE COLLECTOR, AHMEDNAGAR READ WITH TERMS & CONDITIONS CONTAINED**

**IN THE TENDER FORM**

1. Name in Full of the Tenderer :

   (in Block Letters)

2. Address of the Tenderer :

:

:

:

Telephone No. : office ...............................

: Residence ........................

Mobile No. :

Fax No. :

3. Address for Communication :

Telephone No. : office Resi. ............................

Mobile No. :

Fax No. :

I / We have carefully read and understood the above terms and conditions of the Tender attached to this offer and form part of this Tender, which we accept unconditionally and accordingly, offer the price as above mentioned.

**Signature :------------------------**

**Name :**

**Date :**

**Designation :**

**Seal / Rubber Stamp of Organization**

निविदाकाराची स्वाक्षरी

संस्थेविरुध्द अगर तिच्या मालकांविरुध्द अथवा संचालकांविरुध्द आर्थिक अफरातफरीचे अगर फसवणूकीसंबंधी गुन्हे दाखल नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र.

मा.कार्यकारी दंडाधिकारी ------------------------ यांचेसमोर

मी, व्यवस्थापक/चेअरमन ----------------------------------- ------------------------(संस्थेचे नांव) -------------------------------------------------------------पत्ता---------------------------यादवारे शपथेवर सांगतो की, माझे विरुध्द, आमचे संस्थेविरुध्द अगर संस्थेच्या संचालकांविरुध्द अर्थिक अफरातफरीचे अगर फसवणूकीसंबंधी अहमदनगर जिल्हयात अथवा महाराष्ट्रात कोठेही फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल नाही.

वरील मजकुर माझे माहितीप्रमाणे खरा व सत्य आहे. वरील माहिती खोटी निघाल्यास मी भा.दं.वि.कलम 199, 200 प्रमाणे शिक्षेस पात्र राहिल. सदर मजकूर मी आज दिनांक / /2016 रोजी प्रतिज्ञापत्र केलेले आहे.

ओळख

सही - निविदाधारक यांची स्वाक्षरी

नांव-

पत्ता -

(प्रपत्र-अ)

# व्यापारी लिफाफा

## टँकरद्वारे पिण्याचे पाणी वाहतूक करणेबाबतची निविदा.

( सन 2017 )

दिनांक - / /2016

प्रति,

मा.जिल्हाधिकारी अहमदनगर

महोदय,

निविदेमधील अटी व शर्ती मी वाचल्या असून पिण्याचे पाणी वाहतूक करणेसाठीचे निविदेचे अनुषंगाने खालीलप्रमाणे दर सादर करीत आहे.

1) निविदाधारकाचे संपूर्ण नांव :

व पूर्ण पत्ता व दूरध्वनी क्र.

2) 24 तासाकरिता वाहनांचा आवश्यक दर आणि प्रती किलोमिटर करिता ठरलेला

दर आणि फिरतीचा दर खालीलप्रमाणे आहे.

| ज्या उपविभागासाठी निविदा दर भरले त्या उपविभागाचे नांव | टँकरची क्षमता | कमाल प्रतिदिन प्रति मे.टन (रुपये) 24 तासाकरिता | कमाल प्रति कि.मी, प्रति मे.टन भाडे (रुपयात) |
|---|---|---|---|
| | | | |
| | 3000 ते 5000 | रुपये<br>अंकी-<br>अक्षरी | रुपये<br>अंकी-<br>अक्षरी |
| | 7500 ते 12000 अथवा त्यापेक्षा अधिक | रुपये<br>अंकी-<br>अक्षरी | रुपये<br>अंकी-<br>अक्षरी |

निविदा फॉर्मचे सोबत जोडलेले नियम व अटी मी पूर्णपणे वाचल्या असून, त्या मला मान्य व बंधनकारक राहतील.

दिनांक :- / /2016

स्थळ :- अहमदनगर

(श्री. )

निविदा भरणा-याचे संपूर्ण नांव व स्वाक्षरी.

शिक्का

टिपः- सदर प्रपत्र हे नमुना दाखल दिले आहे. व्यापारी लिफाफा हा ऑनलाईन BOQ File मध्येच www.mahatenders.gov.in वर अपलोड करावा लागेल.